# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०–२५६०१२०४
इंजि.– २५६०१२१९
मॅनेज/लॉ/शि.शा. .–२५६०१२१६
आर्टस.– २५६०१२१३
सायन्स.– २५६०१२१४/कॉमर्स–२५६०१२१५
फार्मसी/मेडिकल–२५६०१२२०

परीक्षा विभाग
टेलिग्राफ : "युनिपुणे"
फॅक्स –०२०–२५६०१२०८
फॅक्स –०२०–२५६०१२०४
वेबसाईट:www.unipune.ac.in
ई.मेल coe@unipune.ernet.in

---

संदर्भ :परीक्षा/ कक्ष-३/व्यवस्थापन/ - 1214

दि. २१.७.२०११
23

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये व व्यवस्थापन मान्यताप्राप्त संस्था

विषय : ऑक्टोबर/नोव्हेंबर/डिसेंबर २०११ मध्ये होणा-या एमबीए/ एमपीएम/ एमएमएम/ एमबीएस/ एमसीए/ एमसीएम/पीजीडीबीएम/बीएचएमसीटी/बी.एस्सी.एचएस. या परीक्षांच्या (प्रथम सत्र वगळता) इतर सत्रांसाठी संगणकीय परीक्षा अर्ज भरण्याबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की,ऑक्टोबर/नोव्हेंबर/डिसेंबर २०११ मध्ये होणा-या एमबीए/एमपीएम/एमएमएम/एमबीएस/एमसीए/एमसीएम/पीजीडीबीएम/एचएमसीटी/बी.एस्सी.एचएस. या परीक्षांचे (प्रथम सत्र वगळता) इतर सत्रांसाठी संगणकीय परीक्षा अर्ज भरुन घेण्याबाबतची कार्यपध्दती खालीलप्रमाणे देत आहे.

१. सदरच्या परीक्षेंचे संगणकीय परीक्षा अर्ज परीक्षा विभागातील व्यवस्थापनशास्त्र परीक्षा कक्षात उपलब्ध आहेत. सर्व संस्थांनी आपल्या प्रतिनिधीमार्फत या कक्षातून परीक्षा अर्ज घेऊन जायचे आहेत. त्यासाठी लगेचच कोणतेही शुल्क भरावयाचे नाही.

२. परीक्षा अर्ज भरावयाच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत.

MBA.,MPM,MCM,MMM,MMS/MBS,MCA,BHMCT,B.SC.H.S विनाविलंब शुल्क दि.२७.८.२०११
विलंबशुल्कासह दि.३.९.२०११

PGDBM,PGDEM,PGDHM,PGDMM,PGDMLM,PGDFS,PGDCA,PGDIEM,PGDCM -
विनाविलंब शुल्कासह दि १७.८.२०११
विलंबशुल्कासह दि. २६.८.२०११

३. फ्रेश म्हणजेच नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रथम सत्रांचे परीक्षा अर्ज विद्यापीठाच्या संकेत स्थळावर ( www.unipune.ac.in) उपलब्ध आहेत. प्रथम सत्रासाठी संगणकीय परीक्षा अर्ज भरावयाचे नाहीत. प्रथम सत्राच्या परीक्षा अर्जासोबत गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच शैक्षणिक पात्रता विभागाने दिलेला ११ आकडी क्रमांक परीक्षा अर्जात नमूद करणे आवश्यक आहे.

४. संगणकीय परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांचे नाव नमूद करुनच देणार असल्याने हे अर्ज संबंधित विद्यार्थ्यांनाच द्यावयाचे आहेत. संबंधित विद्यार्थ्याव्यतिरिक्त इतरांना तो अर्ज दिला जात नसल्याची दक्षता घ्यावी. सदरचे अर्ज विद्यार्थ्यांकडून विहित मुदतीत किंवा शक्यतो त्वरीत भरुन घेण्यात यावेत.

५. या परीक्षा अर्जामध्ये विद्यार्थ्यांचे नाव, PRN No., विषय इ. माहिती या कार्यालयाकडूनच नमूद केली जाणार आहे. विद्यार्थ्याने सदर परीक्षा अर्जातील सर्व नोंदी तपासून स्वतःचा पत्ता घालून व सर्व माहिती बरोबर असल्याची खात्री करुन अर्जावर सही करुन संस्थेत जमा करावयाचा आहे.

६. विद्यार्थ्याने स्वतःची सही केल्यानंतर मा. संचालक/प्राचार्य यांनींही त्याची Term Grant आहे किंवा नाही हे तपासून अर्जावर सही करुन नेहमीप्रमाणे या कार्यालयात विहीत मुदतीत परीक्षा अर्ज जमा करावयाचे आहेत. परीक्षा शुल्क व इतर शुल्कांचा डिमांड ड्राफ्ट व परीक्षा अर्ज एकाच वेळेस विद्यापीठात जमा करावेत. डिमांड ड्राफ्ट् एका दिवशी व परीक्षा अर्ज दुस-या दिवशी अशा प्रमाणे परीक्षा अर्ज जमा करु नयेत. असे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

७. परीक्षा व इतर शुल्काबरोबरच विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज शुल्क रु.३०/- घेण्यात यावे आणि परिपत्रक क्र.१२६/२०११ अनुसार नेहमीप्रमाणे सर्व शुल्कांचा डिमांड ड्राफ्ट वित्त विभागात जमा करावा.

८. सदर अर्जाबरोबर विद्यार्थ्याचे नाव, PRN No., विषय यांची स्वतंत्र यादी देण्यात येईल.

९. नोव्हेंबर/डिसेंबर २०११ च्या परीक्षेपर्यंत बसलेल्या विद्यार्थ्यांचा परीक्षा अर्जात समावेश करण्यात आलेला आहे. याव्यतिरिक्त असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज, श्रेणी सुधार (Class Improvement) आणि जे विद्यार्थी दोन्ही सत्रांची परीक्षा एकत्र एकाच वेळी देणार आहेत अशा विद्यार्थ्यांचे आणि प्रथम सत्रास नव्याने प्रवेश घेतलेल्या तसेच सेकंड स्पेशलायझेशन करणा-या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज पूर्वी असलेल्या विहित नमुन्यातच सादर करावयाचे आहेत. म्हणजेच अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज संकेत स्थळावरुन प्रिंट काढून घेऊन ते विद्यार्थ्यांना देण्यात यावे आणि ते परीक्षा अर्ज या कार्यालयात विहित मुदतीत जमा करावेत.

१०. परीक्षा अर्ज विद्यापीठाने दिलेल्या क्रमानुसार म्हणजेच दिलेल्या बॅच नं. व अनुक्रमांकानुसारच लावून द्यावयाचे आहेत.

११. ज्या परीक्षा अर्जात काही त्रुटी असतील किंवा विद्यार्थ्यांना काही विषयांच्याच पेपरला बसावयाचे असल्यास/काही विषयांच्या पेपरला बसवायाचे नसल्यास त्या विषयावर पूर्णपणे काट मारावी. व विद्यार्थ्याला किती विषयांची परीक्षा द्यावयाची आहे ते नमूद करावे. फॉर्मवर वरील बाजूस No.of Subjects Appearing च्या कॉलममध्ये जर विद्यार्थ्यांला परीक्षा अर्जावर असलेल्या विषयांपेक्षा कमी विषयांच्या परीक्षेस बसावयाचे असेल तर तसे त्याने परीक्षा अर्जावर नमूद करणे आवश्यक आहे.

१२. आपणाकडे परीक्षा अर्जासोबत *List of Examination forms* पाठविण्यात येईल. या लिस्टवर दिलेल्या चौकोनात संबंधित विद्यार्थ्यांचा फॉर्म पाठविल्याची टिकमार्क करावी. वित्त विभागास नेहमीप्रमाणे त्यांच्या विहित नमुन्यात शुल्काची संपूर्ण माहिती आवश्यक आहे.

१३. ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरलेला नाही त्यांचे संगणकीय परीक्षा अर्ज जसेच्या तसे या कार्यालयात परत जमा करावेत.

१४. संगणकीय परीक्षा अर्जासोबत अगोदरच्या गुणपत्रकाची झेरॉक्स प्रत जोडण्याची आवश्यकता नाही.

आपणास विनंती की, वरीलप्रमाणे कार्यवाही करुन विद्यापीठास नेहमीप्रमाणे सहकार्य करावे.

कळावे,

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक .

A१/manag.mara./११-१२